मोटार अपघात दावा क्र. २४४/२०२०
प्रविण व ईतर वि. गोविंद व ईतर
नि.क्र.१५

**<u>गैरअर्जदारा क्र.३ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एस.जी.दिवाण यांच्या वतीने शपथेवर सुरू–</u>**

१. मला घटना घडल्यानंतर १० मिनीटामध्ये समजले. त्यानंतर मी, प्रकाश लोमटे व ईतर असे घटनास्थळी गेलो. हे म्हणणे खरे आहे की मी ज्यावेळेस तेथे गेले त्यावेळेस माझे पती रस्त्यावर पडलेले होते. त्या ठिकाणी कोणतेही वाहन नव्हते. माझ्या पतीला कोणत्या वाहनाने धडक दिली ते पतीनेच मला घटनास्थळावरच सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस प्रकाश लोमटे तेथे होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी घटना घडली त्याच दिवशी पतीचे निधन झाले. शासकीय दवाखान्यात पंचनामा व पोस्टमॉर्टम झाले त्यावेळी पोलीस तेथे आलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याच दिवशी मी किंवा प्रकाश लोमटे यांनी पोलीसांना घटनेची माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना घटनेची माहिती माझ्या दिराने १५ दिवसांनी दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला एम.एच.–२४–बीएच ०९५४ या मोटार सायकलने धडक दिली हे मी चुकीचे लिहीलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर १५ दिवसांनी या मोटार सायकलला खोटेपणाने अपघातात गुंतविले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीच्या अपघाताचा व या मोटारसायकलचा काहीही संबंध नाही.

२. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती जिल्हा उदयोग केंद्र बीड येथे वरिष्ठ सहायक म्हणून नोकरीस होते व त्यांना रू.५१,०००/– दरमहा पगार होता व त्यांना शेतीपासून वार्षीक रू.१० लाख उत्पन्न मिळत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझ्या पतीचे वय ६० वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रात दिलेली माहिती चुकीची दिलेली आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2025.11.24 18:24:19 +0530

(पी.पी.केस्तीकर)

दि.२४/११/२०२५

पदसिध्द सदस्य, मो.अ.दा.प्रा.लातूर.